Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 18TH AUGUST 1898.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २९ माहे जूलै, सन १८९८.

#### शुद्धिपत्र.

---

नंबर २४४. — सन १८९८ चा मुंबई शहर म्युनिसिपालिटीचा ऐवज व्याजीं लावण्याबाबद आक्ट, जो तारीख २१ माहे जुलै सन १८९८ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग ९ वा, यांत छापून प्रसिद्ध केला आहे, त्याच्या अ परिशिष्टांत, "म्युनिसिपालिटीच्या इमारतीबदल ( ९ टक्केप्रमाणें ) लोन ( रु. ८०,००० )" या शब्दांच्या व आंकड्यांच्या ऐवजीं "म्युनिसिपालिटीच्या इमारतीबदल ( ९ टक्केप्रमाणें ) लोन ( रु. ८,००,००० )" हे शब्द व आंकडे वाचावे.

आलीजा नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

( सही ) सी. जी. एच्. फासेट,
मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २० माहे जुलै, सन १८९८.

नंबर ४७४१.—हिंदुस्थान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे:—

"होम डिपार्टमेंट.

पब्लिक.

मुक्काम सिमला, तारीख ११ माहे जुलै, सन १८९८.

नंबर १९३१.—हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याच्या १८ व्या कलमाच्या (१) ल्या पोट-कलमांतील ठरावांस, व हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा, नंबर १९६४,* तारीख २ माहे सप्टेंबर, सन १८८७, यांतील हुकुमांस अनुसरून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा, नंबर १३९३†, तारीख ८ माहे जुलै, सन १८९७, यांत प्रसिद्ध केलेल्या, बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याचें व त्या बाहेरून आणण्याचें नियमन करण्याबाबदच्या, कानूंपैकीं २७ व्या कानूच्या बदला जी कानू दाखल करावयाचें योजिलें आहे तिचा खालीं दिलेला मसुदा सर्व लोकांस जाहिर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे.

*तारीख ८ माहे सप्टेंबर सन १८८७ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, याच्या ७८४ व्या पृष्ठावर पुनः प्रसिद्ध केलेला.

†तारीख २२ माहे जुलै सन १८९७ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, याचीं पृष्ठें १३१४ तीं १३२५ यांवर पुनः प्रसिद्ध केलेला.

सदरहू मसुद्याचा विचार, या जाहिरनाम्याच्या तारखेपासून दोन महिने संपल्यावर, करण्यांत येईल.

कानूचा मसुदा.

२७. सन १८७८ चा हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) यांत युद्धसामग्री या शब्दाची ज्याप्रमाणें व्याख्या केली आहे तशा युद्धसामग्रीच्या सदराखालीं येणारा कोणताहि बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचा ज्या कोणत्याहि मनुष्यास, तो आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांवरून, कायदेशीर रीतीनें हक्क असेल त्या मनुष्याला आपल्या स्वतःच्या खातगी उपयोगासाठीं, तो आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांवरून जें मान ठरविलें असेल त्या मानानें, अगर कोणतेंहि मान ठरविलें नसेल त्या प्रसंगीं बाजवी मानानें, तसा कोणताहि बारी पदार्थ, ह्या कानूअन्वयें लैसेन्स घेतल्यावांचून, कबज्यांत ठेवण्याचा किंवा बाहेरून आणण्याचा अधिकार आहे: परंतु एखादा बारी पदार्थ याप्रमाणें बाहेरून आणला असेल तेव्हां कस्टम्सचा कलेक्टर, किंवा या बाबतींत ज्या कोणत्याहि इतर अमलदारास स्थानिक सरकारानें नांवानें किंवा हुद्यापरत्वें अधिकार दिला असेल तो अमलदार, त्या बारी पदार्थांच्या संबंधानें त्याला स्थानिक सरकारचा हुकुम मिळेपर्यंत, तो बारी पदार्थ कोणत्याहि वेळीं अटकावून ठेवण्यास मुखत्यार आहे.

(सही) जे. पी. ह्यूएट,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजा नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) एच्. एस्. लारेन्स,

आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.